महाराष्ट्र शासन
**नगरपालिका प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**
पत्ता:- विभागीय आयुक्त कार्यालय, दिल्ली गेट जवळ, फाजीलपुरा,
☎0240-2970507, ई-मेल: munadmcsndiv@gmail.com

जा.क्र.2025/नपाप्र/लेखा/कावी/ दि. 28/03/2025

**भाग-1 दरपत्रक नोटीस**

प्रति,

1) ----------------------------------------

----------------------------------------

**विषय:-** सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयासाठी आर्थिक वर्ष सन 2025-26 या कालावधीसाठी मासिक तत्वावर वाहन चालकासह वाहन भाडयाने उपलब्ध करुन देण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयासाठी साठी आर्थिक वर्ष सन 2025-26 या कालावधीसाठी मासिक तत्वावर पूर्णवेळ (24*7) वाहन चालकासह, वाहन भाडयाने उपलब्ध करुन देण्याबाबतचे दरपत्रक मोहोरबंद लिफाप्यात मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | वाहन संख्या | वाहनाचा प्रकार | वाहन खरेदी वर्ष | करार कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर. | 1 | AC प्रवासी वाहन | 2022 किंवा नंतर | वार्षिक |

दर पत्रक सादर करण्याचे वेळापत्रक

| | |
|---|---|
| दरपत्रक प्रसिद्धी दिनांक | दिनांक 28/03/2025 |
| दरपत्रक अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक 11/04/2025 रोजी दुपारी 2:00 वाजे पर्यंत |
| दरपत्रक उघडण्याचा दिनांक | दिनांक 11/04/2025 रोजी दुपारी 04:00 वाजता (अथवाअधिकारी जी वेळ देतील त्या दिवशी) |
| *टीप : कार्यालयीन कामकाजानुसार वरील निविदा वेळापत्रकामध्ये बदल होऊ शकतो.<br>टपालाने प्राप्त होणाऱ्या/झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.<br>अटी व शर्ती या सोबत जोडण्यात आले आहेत. | |

(देविदास टेकाळे)
सह आयुक्त
नगर परिषद प्रशासन
विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**प्रत:-**

1. एन.आय.सी. छत्रपती संभाजीनगर यांना देऊन कळविण्यात येते की, वरील दरपत्रकास विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.

**भाग-2 निविदा धारकास उपयुक्त माहिती**

१. सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयासाठी आर्थिक वर्ष सन 2025-26 या कालावधीसाठी वाहन चालकासह, वाहन भाडयाने उपलब्ध करुन देणे

२. निविदा दोन लिफाफा पध्दतीने भरावयाची आहे. लिफाफा क्रमांक 1 हा तांत्रिक बोलीचा व लिफाफा क्रमांक 2 हा वित्तीय बोलीचा असेल.

३. दोन्ही लिफाफ्यावर निविदाधारकाचे नाव, कामाचे नाव, विभागाचे नाव, लिफाफा क्रमांक नमूद करावा.

४. निविदा दाखल करण्याची अंतिम मुदत दि,11/04/2025 रोजी दुपारी 02:00 पर्यंत असेन. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा अर्जांची छाननी त्याच दिवशी दुपारी 03:00 वाजता अथवा कार्यालय ठरवेल त्या दिवशी करण्यात येईन.

**भाग-3 लिफाफा क्रमांक 1 तांत्रिक बोलीचा**

I. आर्थिक वर्ष 2023-24 चे आयकर विवरणपत्र
II. दुकान नोंदणी/संस्था नोंदणी प्रमाणपत्र जोडावे. ज्यात वाहन पुरविणे ही बाब अंतर्भूत असावी.
III. पॅन कार्ड व पुरवठा धारकसंस्थेंचे GST नोंदणी क्रमांक
IV. अनुभव प्रमाणपत्र.
V. अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र
VI. पुरवठाधारकांने खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर हितसंबंध नसल्याबाबत हमीपत्र व
VII. काळया यादीत टाकले नसल्याचे हमीपत्र.

**भाग-4 लिफाफा क्रमांक 2 वित्तीय बोलीचा**

I. विविध दर भरणा केलेला निविदा फॉर्म

**भाग -5 अटी व शर्ती**

1. शासनाकडून/मा.संचालनालयाकडून मंजूर मासिक मर्यादेत प्रतिमाह दर विवरणपत्र सादर करावे. त्यामध्ये मुळ दर व इतर कर वेगळे दर्शवून सर्व करासह एकत्रित रक्कम नमुद करावी.
2. वरील कागदपत्राची पुर्तता केली नसल्यास संबंधित संस्थेचे दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.
3. सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी वाहन पुरवठाधारकास व वाहनचालकास कार्यालयीन आदेशानुसार व विहित केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून देण्यात आलेले आदेश बंधनकारक राहतील. वाहन पुरवठाधारक तसेच वाहन चालक यांनी मोटार वाहन कायद्यानुसार प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडील सर्व अटी व शर्तीची पुर्तता केलेली असावी. शासनाकडून/ मा.संचालनालयाकडून मंजूर मासिक मर्यादेच्या अधीन राहून प्राप्त निधी व भविष्यात प्राप्त होणाऱ्या निधीनुसार तसेच आपली सुविधा व्यवस्थीतरीत्या असल्यास आपणास पुढील मुदतवाढ देण्याबाबत कार्यवाही केली जाईल.
4. वाहनाचा विमा, आर.सी.पुस्तीका, वाहन परवाना, वाहनाचा टॅक्स, टॅक्सी परमिट तसेच इतर नियम व अटीची पुर्तता केलेली असावी. वाहनाचे PUC Fitness प्रमाणपत्र वैध असावे.
5. शासनाकडून महाराष्ट्र इलेक्ट्रीक धोरण 2021 नुसार वेळोवेळी केलेले बदल लागू राहतील.
6. वाहनाची देखभाल व दुरुस्ती व इंधन खर्च मासिक भाडे वाहन चालकासह दर दरपत्रकामध्ये दर्शवावे. कंत्राटदाराने सादर केलेल्या देयकातून नियमानुसार शासकीय कपाती केल्या जातील.
7. वाहनचालकाचे पीपीएफ, कामगार विमा, इ.भरण्याची जबाबदारी एजन्सीची राहील.
8. वाहनचालक प्रशिक्षित वाहन चालवण्याचा वैध परवानाधारक असावा त्याच्याकडे आवश्यक कागदपत्र उपलब्ध असावेत
9. पुरवठा करण्यात येणारे वाहन सुव्यस्थित असले पाहिजे. वाहन स्वच्छ व सुसज्ज असले पाहिजे तसेच टोल टॅक्स, एन्ट्री टॅक्स, वाहनतळ फिस, वाहनाचा बिमा, पियुसीचा खर्च इ.एजन्सीनी अदा करावे लागतील.
10. वाहन शक्यतो सन 2022 किंवा त्या नंतरच्या वर्षातील कालावधीचे असावे.
11. वाहन पूर्णवेळ मासिक तत्वावर (24*7) उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.
12. नशापाणी करत नसल्याबाबत व कोणताही गुन्हा दाखल नसल्याबाबतचे वाहन चालकाचे शपथपत्र, एजन्सीच्या प्राधिकृत व्यक्तिच्या प्रतिस्वाक्षरीने दाखल करावे.

13. वाहन धारकाची नैतिकता/चारित्र्य स्वच्छ असले पाहिजे. तसेच वर्तन / वागणूक चांगली असली पाहिजे. वाहनचालकास छत्रपती संभाजीनगर विभागातील रस्त्याची चांगल्या प्रकारे माहिती असणे आवश्यक आहे.
14. वाहनाच्या वापरदरम्यान वापरकर्त्यास कोणतीही इजा किंवा जिवित हाणी झाल्यास एजन्सीस जबाबदार धरले जाईल. अशा घटनांमुळे उद्भवणाऱ्या न्यायालयातील कोणतेही खटले / दंड संदर्भात एजन्सी उत्तरदायी असेल.
15. वाहन चालवतांना रस्त्यावर कोणत्याही प्रकारची दुर्घटना उद्भवल्यास / घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी / उत्तरदायीत्व एजन्सीची राहील. त्याला कार्यालय / अधिकारी जबाबदार असणार नाहीत. वाहनाच्या दुरुस्तीवर तसेच पुढील वाहनास / व्यक्तीस होणारा सर्व खर्च एजन्सीला अदा करावा लागेल.
16. वाहन पुरविण्याचा कालावधी कार्यारंभ आदेश दिल्यापासून वैध राहील.
17. वाहन नियमितपणे पुरविण्यात यावे. वारंवार वाहन बदलण्यास परवानगी मिळणार नाही. तथापि वाहन नादुरुस्त झाल्यास तात्काळ पर्यायी वाहन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी एजन्सीची असेल. वाहन वेळीच उपलब्ध न झाल्यास प्रतिदिन रु.200/- दंड आकारला जाईल.
18. दररोजच्या रीपोर्टिंगच्या ठिकाणाहून सुटण्यापासून ते पोहचण्यापर्यंतचे किलोमीटरची नोंद असलेले लॉगबूक अद्यावत ठेवले असले पाहिले. त्यावर वेळोवेळी सह आयुक्त यांची स्वाक्षरी घेऊन त्याची प्रत मासिक देयाकासोबत जोडावी.
19. अनुदानाच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
20. कार्यालयास वाहनाची आवश्यकता नसल्यास अथवा निधी मिळणे बंद झाल्यास कोणत्याही वेळी वाहन बंद करण्याचे अधिकार नगरपरिषद प्रशासन शाखेस राहतील.
21. एजन्सीची असमाधानकारक सेवा किंवा इतर कोणत्याही कारणामुळे अटी व शर्तीचा भंग झाल्यास देण्यात येणारे कार्यादेश रद्द करण्याचे सर्व अधिकार या कार्यालयाकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.
22. वाहनाचे दर दरपत्रकात नमूद करताना शक्यतो खाली दिलेल्या नमुन्याप्रमाणे नमूद करावेत.
23. इंधन दरात बदल झाला तरी कोणतीही दरवाढ मिळणार नाही. वाहन हे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे नियमानुसार वैध असावे. वाहन सुस्थितीत नसल्यास स्विकारले जाणार नाही.
24. एजन्सीची निवड झालेनंतर वाहनाचे रजिष्ट्रेशन, पुस्तक, कराधानपुस्तक, वाहनाचा विमा उतरविल्याचे कागदपत्रे, वाहन चालविण्याचा परवाना, पॅन कार्ड, इत्यादी कागदपत्रांच्या सांक्षाकित प्रती सादर करणे बंधनकारक राहील.
25. ज्या संस्थेचे किमान दर मान्य होतील त्यांना रु.500/-च्या स्टॅम्पपेपरवर करारनामा स्वखर्चाने करुन द्यावा लागेल.
26. दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दि.11/04/2025 वेळ दुपारी 02:00 असून त्यानंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.
27. दरपत्रके स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना राहतील.
28. वरील अटी व शर्ती आम्ही वाचले असून ते आम्हाला मान्य आहेत.

दिनांक:

संस्थेचे नाव, सही व शिक्का

ठिकाण:

(देविदास टेकाळे)
सह आयुक्त
नगर परिषद प्रशासन
विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

## वित्तीय लिफाफा

निविदा धारकाचे नाव :______________________________

किमान आवश्यक वापर (किलोमीटर) : 1500 किमी प्रती महिना

**नमूद दर सर्व करांसहित असावेत**

| अ.क्र. | तपशील | वाहन संख्या | दर | एकून दर रक्कम रु. (WITH TAXES) |
|---|---|---|---|---|
| 1 | वाहनाचा प्रकार व तपशील (मॉडेल नाव व क्रमांक खाली नमूद करावे) | 1 | प्रती महिना | |
| 2 | दर मासिक 1500 किमी पर्यंत | 1 | प्रती महिना | |
| 3 | 1500 किमी ते 3000 किमी पर्यंत प्रती किमी दर | 1 | प्रती किमी | |
| 4 | 3000 किमी वरील प्रती किलोमीटर दर | 1 | प्रती किमी | |

**दिनांक :**

**ठिकाण :**

**निविदा धारकाचा पत्ता शिक्का** **निविदा / पुरवठादाराची स्वाक्षरी**

**नाव व संपर्क क्रमांक**

**हमीपत्र**

मी श्री.------------------------------------------------------------------- या संस्था/फर्मचा मालक/प्रो.पा. असून आर्थिक वर्ष सन 2025-26 या कालावधीसाठी सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयासाठी एक वाहन भाडयाने देण्याबाबतचे दरपत्रक सादर करीत असून माझे किंवा माझ्या फर्मचे, खरेदी प्राधिकाऱ्यासोबत कोणत्याही प्रकारचे हित संबंध नाही. भविष्यात असे काही आढळल्यास मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील. याची मला पुर्ण जाणीव आहे.

करीता मी हे हमीपत्र लिहून देत आहे.

दिनांक:
ठिकाण:

संस्थेचे नाव, सही व शिक्का

**काळया यादीत टाकले नसल्याचे हमीपत्र**

मी श्री.--------------------------------------------------------------या संस्था/फर्मचा मालक/प्रो.पा. असून सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयासाठी या आर्थिक वर्ष सन 2025-26 या कालावधीसाठी भाड्याने देण्याबाबतचे दरपत्रक सादर करीत असून माझी संस्था/फर्मला यापुर्वी काळया यादील टाकण्यात आलेली नाही. भविष्यात असे काही आढळयास मी कायदेशिर कार्यवाहीस पात्र राहील. याची मला पुर्ण जाणीव आहे.

करीता मी हे हमीपत्र लिहून देत आहे.

दिनांक:
ठिकाण:

संस्थेचे नाव, सही व शिक्का